आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप !
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा !

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

**पान ८**

मोक्कान्वये सात वर्षांचा कारावास
बिष्णोईचे फलक देणाऱ्या अज्ञाताविरुद्ध गुन्हा
ङ्गएनडीपीएसफ गुन्ह्यातील ङ्गयुवराजफ फरारी

**शेवटचे पान**

सातपूर बसस्थानकाचा चेहरामोहरा बदलतोय
महामार्ग बसस्थानक कात टाकणार
सीबीएसचे नूतनीकरण काम प्रगतिपथावर

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक २५० | रविवार, दि. १८ मे २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर

**राज-का-रण**

## गटबाजीचा खांदेपालट

माणूस बदलला तरी संघर्ष कायम हा या नव्या गटबाजीचा अर्थ. यातून कोण कसा मार्ग काढून आपल्या नेतृत्वाची दिशा प्रशस्त करतो, ते येत्या काही दिवसांमध्ये कळेलच. पण कुठेही गेले तरी गटबाजीला पर्याय नाही, या वैश्विक सत्याची प्रचिती यानिमित्ताने पुन्हा एकदा अनुभवास येत आहे.

**वाचा शब्दगंधमध्ये**

# थरूरवरून तणातणी

## आम्ही नाव दिले नाही : काँग्रेस

## आम्हीच नावाची निवड केली : सरकार

- ऑपरेशन सिंदूर जगभर पोहोचवणार
- सर्वपक्षीय शिष्टमंडळाची स्थापना
- शशी थरूर यांचा समावेश

**नवी दिल्ली | वृत्तसंस्था**

दहशतवादाविरोधातील भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी केंद्र सरकारने सात सदस्यीय सर्वपक्षीय शिष्टमंडळाची स्थापना केली आहे. हे शिष्टमंडळ जगभरातील प्रमुख देशांचा दौरा करून तेथे भारताची भूमिका स्पष्टपणे मांडणार आहे. मात्र या शिष्टमंडळामध्ये शशी थरूर यांचा समावेश करण्यात आल्याने काँग्रेस-सरकारमध्ये तणातणी सुरू झाली आहे. आपण दिलेल्या चार नावांपैकी कुणाचाच या शिष्टमंडळात समावेश केलेला नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे. तर आम्हीच नावाची निवड केली असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

दहशतवादाविरोधातील भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी केंद्र सरकारने सात सदस्यीय सर्वपक्षीय शिष्टमंडळाची स्थापना केली आहे. हे शिष्टमंडळ जगभरातील प्रमुख देशांचा दौरा करून तेथे भारताची भूमिका स्पष्टपणे मांडणार आहे. या शिष्टमंडळामध्ये शशी थरूर, रविशंकर प्रसाद, बैजयंत पांडा, संजयकुमार झा, सुप्रिया सुळे, के. कनिमोझी आणि श्रीकांत शिंदे हे सात खासदार शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील. सूत्रांच्या माहितीनुसार, शशी थरूर अमेरिका, रविशंकर प्रसाद मध्य पूर्व, कनिमोझी रशिया आणि स्पेन, सुप्रिया पान १० वर



माझ्या पक्षाच्या नेतृत्वाला माझी पात्रता आणि माझ्यामधील वैगुण्यांबाबत बोलण्याचा हक्क आहे. त्याबाबत मी फार काही बोलणार नाही. माझ्यावर जी जबाबदारी सोपवण्यात आली आहे तिचा मी सन्मान करतो. तसेच ही जबाबदारी मी माझ्या दीर्घ कारकीर्दीमध्ये माझ्यावर सोपवण्यात आलेली प्रत्येक जबाबदारी पूर्ण केली आहे. मग ती जबाबदारी संयुक्त राष्ट्रांमधील असो वा काँग्रेस पक्षामधील असो, ती पूर्ण केली आहे. जेव्हा देशाला माझी गरज असेल, तेव्हा मी नेहमी उपलब्ध असेन.

■ शशी थरूर

### या खासदारांचा समावेश

अनुराग ठाकूर, अपराजिता सारंगी, मनीष तिवारी, असदुद्दीन ओवेसी, अमर सिंह, राजीव प्रताप रुडी, समिक भट्टाचार्य, बृज लाल, सरफराज अहमद, प्रियंका चतुर्वेदी, विक्रमजीत साहनी, सस्मित पात्रा आणि भुवनेश्वर कलिता यांच्यासह इतर पक्षांच्या खासदारांचा शिष्टमंडळात समावेश असेल.

## दिल्ली महापालिकेत आम आदमी पक्षात फूट

**नवी दिल्ली |** दिल्लीतील सत्ता गमावणाऱ्या अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षात मोठी फूट पडली आहे. दिल्ली महापालिकेत पक्षातील अनेक वरिष्ठ नेत्यांनी एकत्र येत वेगळा गट स्थापन केल्याची घोषणा केली आहे. दिल्ली नगर निगम म्हणजे महापालिकेमध्ये १३ नगरसेवकांनी 'आआपा'ला रामराम करत वेगळा गट तयार केला आहे. हेमचंद गोयल यांच्या नेतृत्वाखाली १३ जणांनी 'आआपा'च्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत इंद्रप्रस्थ विकास पार्टी नावाने वेगळा गट तयार केला आहे. मुकेश गोयल हे या पक्षाचे नवे नेते असतील. दिल्ली महापालिकेत गेल्याच महिन्यात मोठा उलटफेर पाहायला मिळाला होता. भाजपचे नगरसेवक राजा इक्बाल सिंह नवे महापौर बनले. त्यांना १३३ मते मिळाली, तर काँग्रेसचे उमेदवार मनदीप यांना केवळ आठ मतांवर समाधान मानावे लागले. 'आआपा'ने महापौरपदाच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. 'आआपा'ने निवडणुकीत उमेदवार दिला नव्हता. या संपूर्ण घटनाक्रमानंतर 'आआपा'मधील नेत्यांमध्ये नाराजी पसरली होती. ही नाराजी स्पष्टपणे दिसून येत होती.

### पाकसाठी हेरगिरी; महिला यूट्यूबर अटकेत

हरियाणातील ट्रॅव्हल यूट्यूबर ज्योती मल्होत्राला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली कैथल येथून अटक करण्यात आली आहे. हरियाणा आणि पंजाब पोलिसांनी आतापर्यंत भारताची हेरगिरी करणाऱ्या एकूण सहा लोकांना अटक केली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी महिला यूट्यूबर आणि इतर लोक पाकिस्तानच्या आयएसआय संघटनेच्या संपर्कात होते. यूट्यूबर असलेली ज्योती मल्होत्रा ही पाकिस्तान उच्चायुक्तालयात काम करणाऱ्या दानिश नावाच्या अधिकाऱ्याच्या संपर्कात होती. ज्योती मल्होत्रा स्वतःचे ट्रॅव्हल चॅनल चालवते, ती पाकिस्तानलाही गेली होती आणि पाकिस्तानमध्ये अनेक गुप्तचर माहिती शेअर करत होती.





◉ नळवंडी, हातनोरे, पाडे परिसरात अवकाळी पावसाने ओहोळला आलेला पूर. दुसऱ्या छायाचित्रात कोलवण नदीवरील निळवंडी येथील धबधबा वाहत होता. ऐन उन्हाळ्यात धबधबा वाहत असल्याने अनेकांचे लक्ष वेधून घेतले जात होते. यावेळी अनेकांनी फोटो काढण्यासाठी गर्दी केली होती. (संबंधित वृत्त आतील पानात)

# पुढील पाच दिवस पावसाची शक्यता

## काही जिल्ह्यांना ऑरेंज तर काहींना यलो अलर्ट

**पुणे | प्रतिनिधी**

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी शनिवारी (दि.१७) दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीव आणि कोमोरियन बेटे, दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान बेटे आणि अंदमान समुद्राचा उर्वरित भाग व्यापला आहे. पूर्व मध्य बंगालच्या उपसागरातही मोसमी वाऱ्यांची प्रगती झाली आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये पुढील पाच दिवसांसाठी पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

विदर्भात पुढील पाच दिवस तर कोकणात १९ आणि २० मे रोजी आणि मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात २० आणि २१ मे रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. आजपासून पुढील तीन दिवस मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडू शकतो, तर उद्या कोकणातही तुरळक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पान १० वर

### बेमोसमी पावसाचा कहर सुरूच

गेल्या आठवड्यापासून शहर आणि जिल्ह्यात बेमोसमी पावसाचा कहर सुरू आहे. यामुळे पिकांचे व शेतात काढून ठेवलेल्या मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरीवर्गाचे अक्षरश: कंबरडे मोडले आहे. काही ठिकाणी चाळींमध्येही पाणी शिरल्याने कांदा भिजला आहे.शेतात कापून ठेवलेला गहूही भिजल्याने नुकसान झाले आहे. फळबागांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शुक्रवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे पेठ व दिंडोरी तालुक्यातील नद्या, नाल्यांना पूर आला आहे.

# शहांमुळे भाजप-शिवसेनेत दरी

**मुंबई | प्रतिनिधी**

भाजपचे नेते अमित शहा जेव्हापासून दिल्लीत आले तेव्हापासून शिवसेना आणि भाजपमधील दरी वाढायला सुरुवात झाली, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना केला. तसेच ईडीकडून जेव्हा मला अटक होणार होती त्याच्या आदल्याच दिवशी मला एकनाथ शिंदेंचा फोन आला होता, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

**राऊत यांची टीका**

मुंबईतील पत्राचाळ गैरव्यवहार प्रकरणाच्या आरोपावरून ईडीने संजय राऊत यांना अटक केली होती. त्यामुळे राऊत यांना आर्थर रोड तुरुंगात राहावे लागले होते. तुरुंगातील या अनुभवाचे कथन करणारे 'स्वर्गातील नरक' या पुस्तकाचे प्रकाशन आज मुंबईत पार पडले. तत्पूर्वी बोलताना राऊत यांनी अमित शहा यांच्यावर निशाणा साधला.

शिवसेना आणि भाजपमध्ये अतिशय चांगले संबंध होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत कौटुंबिक नाते होते. मात्र, अमित शहा जेव्हापासून दिल्लीत आले तेव्हापासून हे संबंध दुरावायला सुरुवात झाली. भाजपचे ज्येष्ठ नेते अरुण जेटली जेव्हा आजारी होते तेव्हा त्यांनीदेखील अमित शहांना दोनदा समजावले होते. शिवसेना आपला जुना पान १० वर

### ...तर पुस्तक लिहायची वेळ आली नसती : शिंदे

जर संजय राऊत यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर निष्ठा ठेवली असती तर आज अशी पुस्तक लिहिण्याची वेळ आली नसती, असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला. तर सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी एकनाथ शिंदे राऊत यांना कशाला फोन करतील? राऊत हे कोण आहेत? असे सवाल करत, आज संजय राऊत हे जामिनावर बाहेर आहेत. त्यांना पत्राचाळ गैरव्यवहारप्रकरणी अटक झाली होती. त्या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. राऊत पुन्हा कधीही आत जाऊ शकतात, असा दावा केला.

# देशावरील संकटकाळात पंतप्रधानांसोबत : ठाकरे

**मुंबई | वृत्तसंस्था**

काश्मीर हे आपले आहे. काश्मीर कालही आपले होते, आजही आपले आहे आणि उद्याही आपलेच राहील. एकवेळ देशात भाजप राहणार नाही पण काश्मीर आपलेच राहील, असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केले. उद्धव ठाकरे यांनी मुंबईत भारत आणि पाकिस्तान तणावावर भाष्य केले. याचवेळी देशावर संकट आले तर आम्ही कायम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत असू, अशी भूमिकाही उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केली.



ते शनिवारी शिवसेना भवनात आमदार, खासदार आणि जिल्हाप्रमुखांच्या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर उद्धव ठाकरे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

ते म्हणाले, आपला वैचारिक विरोध असेल पण देशावर काही संकट आले तर आम्ही कायम पंतप्रधान यांच्यासोबत असू. आम्ही देशाच्या विरोधात नाही पण सरकारच्या विरोधात आहोत. 'वन नेशन वन इलेक्शन'चा अभ्यास सुरू आहे, कमिटी महाराष्ट्रात आहे पण निवडणूक ही पारदर्शकपणे घ्या. वन नेशन पान १० वर

# रात्र थोडी सोंगे फार

## सिंहस्थासाठी ना निधी, ना प्राधिकरण

**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिकमध्ये दर बारा वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी शासनाने ना निधी दिला ना प्राधिकरण केले. महापालिकेने १५ हजार कोटींचा आराखडा पाठवला, त्याला लवकरच वर्ष होईल, मात्र शासनाने त्याला मंजुरीदेखील दिलेली नाही. आता सिंहस्थासाठी दोन वर्षांपेक्षाही कमी वेळ राहिल्याने मोठी कामे कशी होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे महत्त्वाची कामे वेळ कमी असल्याने तात्पुरत्या स्वरुपात करण्याची वेळ प्रशासनावर येणार का? अशी चर्चा आहे.

२०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. मात्र मागच्या वर्षीच विकासकामांची सुरुवात होणे अपेक्षित होते, मात्र आता कमी वेळेत जास्त कामे करावी लागणार असल्याने कामे दर्जेदार होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सिंहस्थापूर्वी नदीपात्र शुद्धीकरण, पूल व घाट बांधणी, मलजल प्रक्रिया प्रकल्प, रस्ते आणि पार्किंग व्यवस्था, सीसीटीव्ही उभारणी, कचरा डेपो उभारणी, रिंगरोड यांसारखी मोठी कामे प्राधान्याने होणे अपेक्षित आहे. मात्र त्यांना मुहूर्त कधी लागणार आहे? जर तत्काळ कामांना सुरुवात झाली नाही तर पुन्हा एकदा कुंभमेळ्याच्या तोंडावर घाईघाईने काम उरकण्याची वेळ येणार आहे. नाशिकमध्ये पायाभूत सुविधा उभारण्याबरोबर विकास करण्यासाठी सिंहस्थाचा निधी महत्त्वाचा असतो. मात्र यंदा प्रयागराज व उज्जैनच्या धर्तीवर महाराष्ट्र शासन देखील प्राधिकरण स्थापन करणार आहे. त्यामुळे मनपाला निधी मिळालेला नाही. सिंहस्थाच्या हजारो कोटींच्या निधीतून पान १० वर

### कामे कधी सुरू होणार

राज्य शासनाने रिंग रोड व त्र्यंबकेश्वर-नाशिक रस्त्याच्या काँक्रीटीकरणासाठी २२७० कोटी रुपयांची तरतूद केली असली तरी निधी अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात कधी होणार, याबाबत स्पष्टता नाही.

# स्पेशल छब्बीसचा कारनामा फसला

## भुजबळांकडे दीड कोटी खंडणीची मागणी; पदवीधर तरुण गजाआड

**नाशिक | प्रतिनिधी**

आमदार तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्याकडे दीड कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या दुर्गम पेठ तालुक्यातील बीएसस्सी पदवीधर तरुणास अखेर अटक करण्यात आली. 'स्पेशल छब्बीस' चित्रपटात दाखवण्यात आलेल्या सीबीयआयच्या बनावट छापेमारीची नक्कल करून या पदवीधराने आयकर अधिकारी असल्याचे भुजबळांच्या स्वीय सहाय्यकास सांगितले आणि त्र्यंबकेश्वर येथील भुजबळांच्या फार्महाऊसवरील घबाडावर इन्कमटॅक्स विभाग रेड करणार असल्याचे सांगून सेटलमेंटसाठी एक कोटी साठ लाख रुपयांची खंडणी मागितली होती. मात्र गुन्हे शाखा युनिट एकने कॉल लोकेशनच्या जोरावर संशयितास रंगेहाथ पकडले. पान १० वर

### डील एक कोटींपर्यंत

भुसारे याने गायकवाड यांना फोन केल्यावर फार्म हाऊसवर रेड टाकण्याची कारवाई शिथिल करण्यासाठी १ कोटी ६० लाखांची मागणी केली. मात्र, पोलीस व गायकवाड यांनी भुसारेला खेळवून ठेवत ही रक्कम एक कोटी रुपयांपर्यंत कमी केली व तत्काळ आणून देण्याचे सांगत तोपर्यंत रेड करू नका असे सांगितले. मात्र, पोलिसांनी मोबाईल लोकेशन व इतर तांत्रिक विश्लेषण करून भुसारेचा माग काढला.



संशयित भुसारे याने हॉटेल व्यवसाय केला परंतु त्यामध्ये अपयश आल्याने त्याने हा डाव आखल्याचे समोर येत आहे. भुसारे हा अविवाहित असून, त्याने गुगल व इतर सर्च इंजिनवरून ऑनलाईन पद्धतीने भुजबळांची माहिती मिळवत गुन्हा केल्याचे निष्पन्न होत आहे.

■ मधुकर कड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे-१

### ट्रक ड्रायव्हरचे मोबाईल वापरले

भुसारे याने स्वत:चा मोबाईल न वापरता वेगवेगळे दहा ते बारा मोबाईल नंबर वापरले. हे नंबर पडताळले असता ते विविध राज्यातील ट्रकचालकांचे व काही अनोळखींचे आढळून आले. कारण भुसारे याने पेठ, करंजाळी व विविध भागातील हॉटेल व ढाब्यांवर थांबलेल्या ट्रकचालकांचे मोबाईल 'अर्जंट फोन' करण्याच्या बहाण्याने ताब्यात घेत गायकवाड व सोनवणे यांना फोन केले. त्यामुळे नेमके लोकेशन शोधण्यात पोलिसांना काहीसा वेळ लागला.

माझ्या मोबाईल क्रमांकावर आलेले कॉल स्वीय सहाय्यक गायकवाड हे उचलतात. त्यांनी 'साहेबांकडे काय काम आहे' असे विचारल्यावर संशयिताने खंडणीची मागणी केली. शहर पोलिसांनी कारवाई करून त्याला अटक केली आहे. एप्रिल महिन्यात त्र्यंबकेश्वरमध्ये एका कार्यक्रमानिमित्त गेलो होतो. त्यानंतर हे कॉल्स सुरू झाले होते.

■ **छगन भुजबळ,** आमदार तथा माजी मंत्री

### हेलिकॉप्टर कोसळले

**देहरादून |** केदारनाथमध्ये आज सकाळच्या सुमारास रुग्णांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर क्रॅश झाले. लँडिंग करत असताना ही घटना घडली. या हेलिकॉप्टरमध्ये एक डॉक्टर आणि तीन प्रवासी प्रवास करत होते. हेलिकॉप्टर हे रुग्णांना घेऊन एम्समध्ये जात होते. हेलिकॉप्टरच्या मागील भागात अचानक तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने ही घटना घडली.

**सोनं विकायचं?**

तुमच्या सोन्याला सगळ्यात जास्त किंमत

**टकले ओल्ड गोल्ड**

6 वा मजला, सिद्धी पूजा बिझनेस स्क्वेअर, कुलकर्णी गार्डनजवळ, शरणपूररोड, नाशिक.

9822057000

**पाहिजेत**

**श्री महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित** या नामांकित पतसंस्थेस खालील नमूद केलेल्या विभागामध्ये अल्पबचत प्रतिनिधीच्या नेमणुका करावयाच्या असल्याने इच्छूकांनी **आपले अर्ज एन १०, एन-३/२३/१, रंगोली झेरॉक्स शेजारी, गणेश चौक, सिडको, (नाशिक) मो.नं. ९६७३७५६१५६ वर** नमूद केलेल्या पत्यावर अथवा समक्ष संस्थेत जमा करावे अर्जामध्ये शिक्षण / पॅनकार्ड /आधार कार्ड / फोटो जोडणे आवश्यक आहे.

**• नेमणूक करावयाचे विभाग खालील प्रमाणे •**

१) नाशिकरोड २) जेलरोड ३) सिन्नर फाटा ४)भगुर ५) देवळाली कॅम्प ६) उपनगर, नेहरूनगर ७) नाशिक ८) इंदिरानगर ९) सातपुर १०) सिडको ११) पंचवटी

**अल्पबचत प्रतिनिधी करिता महिला सुद्धा अर्ज करू शकता.**

संपर्क

| सुनिल बुब | रामेश्वर जाजु | जयप्रकाश भट्टड |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | व्यवस्थापक |